नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १९ Issue - 19 | वार गुरुवार दि. ५ जून २०२५ Blow- Thursday Date 5 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# विजयी जल्लोषाला गालबोट, चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू

## मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता; १५ ते २० हून अधिक गंभीर जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरू : आयपीएल विजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (ठ्रूश्र उहरश्रश्रशपस-र्शीी इशपसरश्रीीी) संघाच्या जल्लोषाला गालबोट लागलं आहे. विजेत्या संघाची व्हिक्टरी परेड पाहण्यासाठी झालेल्या तुफान गर्दीमुळे चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेटवर मोठी चेंगराचेंगरी झाली. यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. इतकंच नाही तर या चेंगराचेंगरीत दहा पेक्षा जास्त चाहते जखमी झाले आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. रजत पाटीदार आणि विराट कोहलीच्या ठउइ ने फायनलमध्ये श्रेयस अय्यरच्या पंजाब किंग्जचा पराभव करुन आयपीएल २०२५ च्या चषकावर नाव कोरलं. तब्बल १८ वर्षांनी ठउइ ने मिळवलेल्या विजयामुळे कर्नाटकसह विराटच्या चाहत्यांचा उत्साह प्रचंड आहे. त्यामुळेच आज बंगळुरुत अनेक चाहते चिन्नास्वामी स्टेडियमवर क्रिकेटपटूंची एक झलक पाहण्यासाठी जमा झाले आहेत.

आरसीबीच्या आयपीएल विजेतेपदाचा जल्लोष साजरा करण्यासाठी बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर, १० हून अधिक जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

आरसीबीनं आयपीएलच्या १८ व्या हंगामाचं विजेतेपद पंजाब किंग्जला गुजरातच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये ६ धावांनी पराभूत करत जिंकलं यानंतर बंगळुरुत काल रात्रीपासून विजयाचा जल्लोष करण्यात येत आहे. आज सायंकाळी ५ ते ६ वाजताच्या दरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमवर विजयी जल्लोष साजरा करण्यात येणार होता. मात्र, आरसीबीच्या चाहत्यांची मोठी गर्दी झाल्यानं चेंगराचेंगरी झाल्याची माहिती आहे. या चेंगराचेंगरीत १० जणांचा मृत्यू झाला असून ही संख्या देखील वाढू



शकते. याशिवाय १० ते १५ जण जखमी झाल्याची माहिती.

बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना चेंगराचेंरी झाली. यावेळी परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. पोलिसांनी आरसीबीच्या चाहत्यांवर सौम्य लाठीचार्ज देखील केला. मिळालेल्या माहितीनुसार चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेट क्रमांक ३ जवळ चेंगराचेंगरी सारखी स्थिती निर्माण झाली होती.

स्टेडियमजवळचे रस्ते चाहत्यांच्या गर्दीनं जाम झाले होते. यामुळं मोठी वाहतूक कोंडी देखील निर्माण झाली. आरसीबीची विजेती टीम विजयी जल्लोष साजरा करण्यासाठी मैदानात दाखल होत असताना हा प्रकार घडल्याची माहिती आहे. द हिंदूनं दिलेल्या माहितीनुसार काही जखमींना शिवाजीनगर भागातील बॉवरिंग हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आलं होतं.

आरसीबीची टीम चिन्नास्वामी मैदानावर दाखल होण्यापूर्वी कर्नाटकच्या विधानसौदामध्ये मुख्यमंत्री सिद्धारामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी टीमचा सत्कार केला होता.

# जनगणनेचा मुहूर्त ठरला; केंद्रीय गृह मंत्रालयाकडून तारखा जाहीर




वृत्तसंस्था, नवी दिल्ली : देशभरात जातगणनेसह जनगणना-२०२७ ही प्रक्रिया दोन टप्प्यांमध्ये करण्यात येणार असून, त्याचे वेळापत्रक केंद्र सरकारने बुधवारी जाहीर केले. यानुसार लडाखसारख्या बर्फाळ प्रदेशांमध्ये १ ऑक्टोबर, २०२६पासून आणि त्यानंतर १ मार्च, २०२७पासून देशातील उर्वरित भागांमध्ये जनगणनेची प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती गृह मंत्रालयाने दिली. घरांची गणना करण्याचा टप्पा एप्रिल २०२६पासून सुरू होण्याची शक्यता आहे.

जनगणना कायदा, १९४८ आणि जनगणना नियम, १९९०च्या तरतुदींनुसार भारतात जनगणना केली जाते. गृह मंत्रालयाने म्हटले आहे की, जनगणना कायदा, १९४८च्या कलम ३च्या तरतुदीनुसार, वरील संदर्भ तारखांसह जनगणना करण्याबाबतची अधिसूचना १६ जून, २०२५ रोजी अधिकृत राजपत्रात प्रकाशित केली जाईल. यानुसार लडाख आणि जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशांसह हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या बर्फाळ राज्यांमध्ये १ ऑक्टोबर, २०२६पासून जनगणना प्रक्रिया सुरू होईल. त्यानंतर १ मार्च, २०२७पासून उर्वरित देशात जनगणना प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

देशातील याआधीची शेवटची जनगणना २०११मध्ये दोन टप्प्यांमध्ये करण्यात आली होती. पहिला टप्पा १ एप्रिल ते ३० सप्टेंबर, २०१०पर्यंत चालला, ज्यामध्ये घरांची गणना करण्यात आली. तर, दुसरा टप्पा ९ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी, २०११पर्यंत चालला, ज्यामध्ये जनगणना करण्यात आली. सन २०२१मध्ये प्रस्तावित असलेली पण करोना महामारीमुळे न झालेली जनगणनाही अशाच प्रकारे दोन टप्प्यांमध्ये करण्याचा प्रस्ताव होता. पहिला टप्पा एप्रिल ते सप्टेंबर, २०२० दरम्यान आणि दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२१मध्ये आयोजित करण्यात येणार होता. पहिल्या टप्प्याची सर्व तयारी पूर्ण झाली होती. काही राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये १ एप्रिल, २०२०पासून क्षेत्रीय काम सुरू करण्याचे नियोजन सुरू होते. मात्र, त्याच काळात देशभरात सुरू असलेल्या करोना महामारीमुळे जनगणनेचे काम पुढे ढकलावे लागले, असेही केंद्राने म्हटले आहे. तब्बल १६ वर्षांनंतर देशात जनगणना केली जाणार आहे. या आधीची जनगणना सन २०११मध्ये करण्यात आली होती. या मोठ्या उपक्रमासाठी ३० लाख गणक आणि त्यांचे पर्यवेक्षक नियुक्त केले जाण्याची शक्यता आहे. २०११च्या जनगणनेनुसार, भारताची लोकसंख्या १२१ कोटी एक लाख ९० हजार होती. त्यामध्ये ६२ कोटी ३७ लाख (५१.५४ टक्के) पुरुष आणि ५८ कोटी ६४ लाख (४८.४६ टक्के) महिला होत्या.

# मोफत आणि मर्यादित पासेस, अचानक गर्दी वाढली अन् ११ जणांचा मृत्यू

बंगळुरू : आयपीएलच्या १८ व्या हंगामाचं विजेतेपद रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं पंजाब किंग्जला ६ धावांनी पराभूत करुन जिंकलं. आरसीबीच्या विजयाचं सेलिब्रेशन करण्यासाठी चिन्नास्वामी स्टेडियमवर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम ५ ते ६ दरम्यान होणार होता. आरसीबीच्या व्हॉटस अप चॅनेलवर शेअर करण्यात आलेल्या पोस्टनुसार मोफत आणि मर्यादित पासेस दिले जाणार होते. त्यासाठी बुकिंग करण्यास देखील सांगण्यात आलं होतं. आरसीबीच्या विजयी जल्लोषाचा कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर मोठी गर्दी वाढली आणि चेंगराचेंगरीची घटना घडली. या घटनेत १० जणांचा मृत्यू झाला असून मृतांची संख्या वाढण्याची भीती आहे. १० मृतांमध्ये ६ पुरुष आणि ४ महिलांचा समावेश होता.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या विजयाच्या जल्लोषाचा कार्यक्रम स्टेडियमवर आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी चाहत्यांनी स्टेडियमबाहेर मोठी गर्दी केली. स्टेडियमच्या गेट नंबर ३ वर चेंगराचेंगरी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या चेंगराचेंगरीत १० जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनास्थळावरील प्रत्यक्षदर्शींच्यामते, लोक स्टेडियमबाहेर आणि स्टेडियमच्या आत जमले होते तेव्हा गर्दी नियंत्रणाबाहेर गेली आणि अफरा तफरी निर्माण झाली. यामध्ये काही लोकांचा चेंगराचेंगरीत मृत्यू झाली आणि अनेक जण जखमी झाले.

# मृतांच्या नातेवाईकांना १० लाखांची मदत, १५ दिवसांमध्ये न्यायिक चौकशी : मुख्यमंत्री सिद्धारामय्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरु : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या आयपीएल विजेतेपदाच्या जल्लोषाचं साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येनं चाहते चिन्नास्वामी स्टेडियमजवळ पोहोचले होते. अनियंत्रित गर्दीमुळं झालेल्या चेंगराचेंगरीत ११ लोकांचा मृत्यू झाला. तर, काही जण जखमी आहेत. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धारामय्या यांनी लोकांच्या गर्दीमुळं चेंगराचेंगरी झाली. कर्नाटक सरकारनं मृतांच्या नातेवाईकांना मदत करण्याची घोषणा केली. मुख्यमंत्री सिद्धारामय्या यांनी मृतांच्या नातेवाईकांना १० लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केली. सरकार जखमींवर मोफत उपचार करणार आहे. आम्हाला या घटनेचं राजकारण करायचं नाही. मी या घटनेच्या न्यायिक चौकशीचे आदेश दिले आहेत. १५ दिवसात रिपोर्ट देण्याचे आदेश दिल्याचं ते म्हणाले. मुख्यमंत्री सिद्धारामय्या यांनी एक्स पोस्टवर करुन म्हटलं की, बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये आरसीबीच्या विजयाच्या जल्लोषावेळी झालेल्या चेंगराचेंगरीमुळं काही लोकांचा मृत्यू झाला तर काही जण गंभीर जखमी झाले. ही घटना दुःखदायक आहे. याघटनेमुळं विजयाचा



आनंद संपला आहे. मृतांच्या आत्म्याला शांती मिळो. जखमींवर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. ते लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना करतो, असं सिद्धारामय्या म्हणाले. अशा प्रकारची चेंगराचेंगरी आणि गर्दी अनियंत्रित होऊन अशा अप्रिय घटना होण्याची शक्यता असल्यानं टीमच्या विजय परेड करण्यास मंजुरी देण्यात आली नव्हती. माझ्या संवेदना ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांप्रती आहेत. जनतेला आवाहन करतो की ते या स्थितीला समजून घ्या. प्रेम आणि स्नेहानं जीवन जगत असताना सुरक्षेला प्राधान्य द्यावं, असं सिद्धारामय्या म्हणाले. भाजप आणि जेडीएसनं या प्रकरणी कर्नाटकमधील राज्य सरकारला जबाबदार ठरवत टीका केली. कर्नाटक भाजपानं एक्सवर पोस्ट करुन म्हटलं की, ७ लोकांचा मृत्यू झाला, काँग्रेस सरकारच्या बेजबाबदारपणामुळं चेंगराचेंगरी होऊन काही लोकांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागला. गर्दी नियंत्रित करण्यासाठी कोणतीही उपाययोजना करण्यात आली नव्हती. कोणती पायाभूत व्यवस्था नव्हती. फक्त अराजकता होती, निर्दोष लोक मारले गेले. सिद्धारमय्या आणि डीके शिवकुमार क्रिकेटर्ससोबत रील शूट करण्यात आणि प्रसिद्धीच्या झोतात येण्यात व्यस्त होते. हा बेजबाबदारपणा असून काँग्रेस सरकारचे हात रक्तानं माखलेले आहेत, असा आरोप भाजपनं केला.

जेडीएस नेते आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एचडी कुमारस्वामी यांनी देखील सिद्धारामय्या सरकारवर टीका केली. तयारीमध्ये चूक, आवश्यक उपाययोजना न केल्यानं चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरी झाली. काँग्रेस सरकारनं या घटनेची पूर्ण जबाबदारी घ्यावी. मृतांच्या कुटुंबीयांना तातडीनं मदत द्यावी, जखमींवर चांगले उपचार करावेत, असं कुमारस्वामी म्हणाले.

# २१ जुलैपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन

संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजीजू यांची माहिती

नवी दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरबाबत संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी विरोधी पक्ष सातत्याने करत असताना केंद्र सरकारने बुधवारी थेट संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या तारीखांची घोषणा करून टाकली. आगामी पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते १२ ऑगस्ट या कालावधीत होईल असे केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी सांगितले.

एक्सवरील पोस्टवरून पावसाळी अधिवेशनाची घोषणा करताना रिजिजू यांनी स्पष्ट केले की सरकार संसदेच्या नियमांनुसार सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्यास तयार आहे. रिजिजू म्हणाले की संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज विषयक मंत्रिमंडळ समितीने या तारखा ठरवल्या असून त्या आता राष्ट्रपतींकडे पाठवल्या जातील.

प्रत्येक अधिवेशनच आमच्यासाठी विशेष आहे. अशी टिप्पणी करताना रिजिजू म्हणाले की नियमांनुसार पावसाळी अधिवेशनात सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करता येते. दोन्ही सभागृहांच्या व्यवसाय सल्लागार समित्या (बीएसई) चर्चा करायच्या मुद्द्यांवर निर्णय घेतील. सरकारच्या नियोजनानुसार पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने तीन महिन्यांहून अधिक काळानंतर संसदेची दोन्ही सभागृहे २१ जुलै रोजी सुरू होणार आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशन या वर्षी ३१ जानेवारी ते ४ एप्रिल या काळात झाले होते.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात अलाहाबाद उच्च न्यायालयाचे वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध संसदेत महाभियोग प्रस्ताव येऊ शकतो असे संकेत रिजिजू यांनी दिले. ते म्हणाले की न्या. वर्मा यांच्याविरुद्धच्या महाभियोग प्रस्तावाबाबत मी राजकीय पक्षांशी चर्चा सुरू केली आहे. बहुतेक प्रमुख राजकीय पक्षांना आधीच माहिती देण्यात आली आहे आणि आम्ही सर्व राजकीय पक्ष एकत्र येऊन संयुक्तपणे प्रस्ताव सादर करण्याचा प्रयत्न करत आहोत. दरम्यान संसदेत न्या. वर्मा यांच्याविरुध्द महाभियोग सादर झाला तर ती ऐतिहासिक घटना ठरेल.

कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांची संकल्पना

येत्या शैक्षणिक वर्षात अत्याधुनिक सहा नवे अभ्यासक्रम

# राष्ट्रहिताच्या विचारांनी आयटीआयमध्ये साजरा होणार शिवराज्याभिषेक दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत कौशल्य विकास विभागाच्या वतीने येत्या ६ जूनपासून राज्यातल्या सर्व आयटीआय संस्थांमध्ये राष्ट्रभक्तीच्या विषयांवर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवराज्याभिषेक दिनाच्या निम्मिताने विद्यार्थ्यांमध्ये भारताचा जाज्वल्य इतिहास आणि देशासाठी समर्पणाची भावना रुजावी, पर्यावरण संवर्धनाची भावना जागृत व्हावी, या हेतूने या व्याख्यानमालेचे आयोजन केल्याचे कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. येत्या सहा जूनला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या व्हिडीओ संदेशाद्वारे या व्याख्यानमालेचे उदघाटन होणार आहे. त्याचबरोबर येत्या शैक्षणिक वर्षापासून आयटीआय मध्ये अत्याधुनिक सहा विषयांचे नवे अभ्यासक्रमही सुरु करणार असल्याची माहितीही लोढा यांनी यावेळी दिली.

**ड्रोन, थ्री डी आणि एआयचा समावेश**

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. महाराजांनी केवळ राज्य स्थापन केले नाही, तर प्रभावी प्रशासन, सामाजिक समरसता, जनकल्याण आणि कायद्याचे राज्य निर्माण करून सुराज्य घडवले हे विचार महाराष्ट्राच्या मातीत रुजवले. आजही महाराजांच्या विचारांची समाजाला आणि राष्ट्राला अत्यंत गरज असल्याने कौशल्य विकास विभागाने शिवराज्याभिषेकाच्या मुहूर्तावर राज्यव्यापी १०९७ आयटीआय मध्ये व्याख्यानमालेचे आयोजन केले असल्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्पष्ट केले. कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, नागरी कर्तव्ये आणि स्वदेशी विचार हे पंच परिवर्तन संकल्पनेचे मुख्य आधारभूत विषय असून या व्याख्यानमालेत हेच विषय अंतर्भूत



करण्यात आले आहेत अशी माहितीही मंत्री लोढा यांनी यावेळी दिली. या व्याख्यानामुळे नागरिकांना आपल्या कर्तव्याची जाणीव होईल. कायद्याचे पालन केल्याने राष्ट्र समृद्ध होऊन प्रगती साधता येईल. बंधुभाव वाढीस लागल्याने समाजातील भेद दूर होतील. पर्यावरणाचे संवर्धन करून प्रदूषण विरहित स्वच्छ व सुंदर देश उभा राहील. कुटुंब प्रबोधनामुळे कुटुंब व्यवस्थेत शांती, सुसंवाद, सौहार्द निर्माण होईल,असा विश्वास ही त्यांनी यावेळी व्यक्त केला. या उपक्रमात जनतेने ही सहभाग घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे प्रभारी संचालक सतीश सूर्यवंशी, उपस्थित होते. कौशल्य विकास विभागाने आणलेल्या नव्या खाजगी - सार्वजनिक अर्थात पीपीपी धोरणाला उद्योगक्षेत्राचा चांगला प्रतिसाद लाभत असून येत्या शैक्षणिक वर्षांपासून सहा नवे अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहेत. यात सौर ऊर्जा तंत्रज्ञ, इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञ, ड्रोन तंत्रज्ञ, आर्टिफिशिअल इंटिलिजन्स आणि इंडस्ट्रियल रोबोटिक्स या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यभरातल्या आयटीआय मध्ये सुमारे १ लाख २० हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून यातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे आधुनिक प्रशिक्षण मिळणार आहे. या नव्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराचे जागतिक दालन उघड होणार असल्याचा विश्वास यावेळी मंत्री लोढा यांनी व्यक्त केला.**

## संपादकीय....

### दु:खद घटना

आयपीएलच्या १८ व्या हंगामाचं विजेतेपद रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं पंजाब किंग्जला ६ धावांनी पराभूत करुन जिंकलं. आरसीबीच्या विजयाचं सेलिब्रेशन करण्यासाठी चिन्नास्वामी स्टेडियमवर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम ५ ते ६ दरम्यान होणार होता. आरसीबीच्या व्हॉटस अप चॅनेलवर शेअर करण्यात आलेल्या पोस्टनुसार मोफत आणि मर्यादित पासेस दिले जाणार होते. त्यासाठी बुकिंग करण्यास देखील सांगण्यात आलं होतं. आरसीबीच्या विजयी जल्लोषाचा कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर मोठी गर्दी वाढली आणि चेंगराचेंगरीची घटना घडली. या घटनेत १० जणांचा मृत्यू झाला असून मृतांची संख्या वाढण्याची भीती आहे. १० मृतांमध्ये ६ पुरुष आणि ४ महिलांचा समावेश होता. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या विजयाच्या जल्लोषाचा कार्यक्रम चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी चाहत्यांनी चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर मोठी गर्दी केली. चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेट नंबर ३ वर चेंगराचेंगरी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या चेंगराचेंगरीत १० जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनास्थळावरील प्रत्यक्षदर्शींच्यामते, लोक स्टेडियमबाहेर आणि स्टेडियमच्या आत जमले होते तेव्हा गर्दी नियंत्रणाबाहेर गेली आणि अफरा तफरी निर्माण झाली. यामध्ये काही लोकांचा चेंगराचेंगरीत मृत्यू झाली आणि अनेक जण जखमी झाले. जखमींची स्थिती गंभीर असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.वृत्तसंस्था एएनआयनुसार चिन्नास्वामी स्टेडियमच्या भींतीवर चाहते पोहोचले होते. पोलिसांनी चाहत्यांना तिथून निघून जाण्याचं आवाहन केलं. याशिवाय काही जणांवर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचं पाहायला मिळालं. काही चाहत्यांना स्टेडियममध्ये प्रवेश न मिळाल्यानं कारची तोडफोड देखील झाल्याचं पाहायला मिळालं.चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेटवर झालेल्या चेंगराचेंगरीमुळं पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. पोलिसांनी लाठीचार्ज केला. या दरम्यान पावसाला देखील सुरुवात झाली. त्यामुळं लोक आजूबाजूला धावू लागले.

# वसुंधरेचं वाळवंट होता कामा नये : जागतिक पर्यावरण दिन






– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी जगभर ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्राचे प्रमुख साधन आहे. सृष्टी हे सजीव व निर्जिव वस्तुचे मिश्रण आहे, झाडे ही जीवन आहे. सृष्टीकर्त्याने जीवनाचे मिश्रण अशा प्रकारे केले आहे की, ते सृष्टीच्या जीवनचक्राला संतुलीत ठेवते. कोणत्याही सजीव निर्जीव रचनेसोबत मनुष्याने केलेल्या छेडछाडीचे परिणाम संपूर्ण जीवन सृष्टीला भोगावे लागतात. वृक्षवल्ली हा या सृष्टीचा खरा आधार आहे. तेव्हाच राज्य हिरवेगार होईल आणि आपण प्रदुषण विरहित वातावरणात स्वच्छंद श्वास घेवू यासाठी सर्वांनी कटीबध्द राहावे, कारण तो जीवकी प्राण आहे झाडे लावा आणि जगवा व अमूल्य असे जीवन वाचवा.

जागतिक पर्यावरण दिन हा सार्वजनिक पोहोचण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ आहे, ज्यामध्ये दरवर्षी १४३ हून अधिक देशांचा सहभाग असतो. दरवर्षी, कार्यक्रमाने व्यवसाय, गैर-सरकारी संस्था, समुदाय, सरकार आणि ख्यातनाम व्यक्तींना पर्यावरणीय कारणांचे समर्थन करण्यासाठी एक थीम आणि मंच प्रदान केला आहे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी यादिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पर्यावरण दिवस या दिवशी त्या गोष्टी बद्दल जागरूक केले जाते. ज्यांचा जगावर आणि पर्यावरणावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतात. हा दिवस पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या जबाबदारीचे आपल्याला जाणीव आणि दृष्टिकोन देतो.

आजच्या दिवशी म्हणजेच ५ जून रोजी जगभर पर्यावरण दिवस अगदी थाटामाटाने साजरा केला जातो. त्यादिवशी पुढील जीवनातील परिस्तिथी किती बिकट होईल ते पाहता त्यासाठी जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणी उपक्रम करून भाषणे करून, झाडे लावा उपक्रम राबवून पुढील धोका टाळण्याचे आज कार्य केले जाते. यासर्वांतूनच या दिवसाची जागरूकता निर्माण होते. आपल्या मातेसमान पृथ्वी आहे आणि तिच्या पर्यावरणाची काळजी सर्वांनी घ्यावी. जवळपास पाच दशकांपासून जागतिक पर्यावरण दिन जागरूकता वाढवत आहे, कृतीला समर्थन देत आहे आणि पर्यावरणासाठी बदल घडवून आणत आहे. जागतिक पर्यावरण दिनाची थीम ग्रीन सिटीज होती आणि घोषणा होती प्लॅन्ट फॉर द प्लॅनेट! २००५ ला साध्य केली. विषय वाळवंट आणि वाळवंटीकरण होता आणि वाळवंटात कोरडवाहू नको असे घोषवाक्य होते.

२०११ च्या जागतिक पर्यावरण दिनाचे आयोजन भारताने केले होते. दिवसाचे यजमानपद भूषवण्याची भारताची ही पहिली वेळ होती. २०११ ची थीम 'फॉरेस्ट्स – नेचर ॲट युवर सर्व्हिस' होती. समुद्र किनारा स्वच्छता, मैफिली, प्रदर्शने, चित्रपट महोत्सव, सामुदायिक कार्यक्रम, वृक्षारोपण आणि बरेच काही यासह जगभरात हजारो उपक्रम आयोजित केले गेले. भारतात नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यासाठी आणि पर्यावरणासाठी जनजागृती करण्यासाठी कदंबचे रोपटे लावले. भारत येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उपक्रम २०१८ ची थीम बीट प्लास्टिक पोल्युशन होती. यजमान राष्ट्र भारत होता. ही थीम निवडून, प्लास्टिक प्रदूषणाचा मोठा भार कमी करण्यासाठी लोक त्यांचे दैनंदिन जीवन बदलण्याचा प्रयत्न करतील अशी आशा आहे. लोक एकल-वापर किंवा डिस्पोजेबलवर जास्त अवलंबून राहण्यापासून मुक्त असले पाहिजे कारण त्यांचे गंभीर पर्यावरणीय परिणाम आहेत. आपण आपली नैसर्गिक ठिकाणे, आपले वन्यजीव आणि आपले स्वतःचे आरोग्य प्लास्टिकपासून मुक्त केले पाहिजे. भारत सरकारने २०२२ पर्यंत भारतातील सर्व प्लास्टिकचा एकच वापर दूर करण्याचे वचन दिले आहे.

औद्योगीकीकरण आणि शहरीकरणांच्या प्रक्रियेत प्रदुषणाची समस्या देखील अधिक तीव्र होत आहे. त्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. पर्यावरणाला या हानी पासुन वाचविण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. त्यादृष्टिने वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे। ही सर्वश्रेष्ठ तुकाराम महाराजांची शिकवण आचरणात आणुन अख्या महाराष्ट्रात व्यापक प्रमाणात वृक्षरोपणाचा उपक्रम हाती घेतला पाहिजे. एकीकडे वृक्षरोपणाचा गाजावाजा करीत झाडे लावली जातात परंतू नंतर त्याची निगा राखली जात नाही. मृतपाय अवस्थेत ती झाडे असतात ही शोकांतीका आहे. तेव्हा राज्यात मोठया शहरातील महानगर पालीका, नगर पालीका, ग्राम पंचायती, नगर परिषदा यांना वृक्षरोपणाचा उपक्रम राबविण्यासाठी सक्ती केली पाहिजे. कारण राज्याच्या प्रमुख शहरातील वृक्ष तोड सारखी वाढते आहे. त्यामुळे शहरातील सौंदर्यीकरण व सुशोभीकरण असलेले शहरे वृक्ष नसल्यामुळे पार शहरे बकाल होत चाललेली आहेत. त्यामुळे पर्यावरणात सारखी वाढ होत आहे. जिकडे-तिकडे प्रदुषण पाय पसरवित असल्यामुळे आरोग्य असुरक्षीत आहे. वाढते शहरीकरण आणि औद्योगीकीकरणामुळे निर्माण होणारा नैसर्गीक असमतोल दुर करण्यासाठी तसेच स्वच्छ व हरीत पर्यावरणाच्या निर्मीतीसाठी प्रकल्पाची संकल्पना शासनाने साकारली पाहिजे.

जमीन मोकळी करण्यासाठी राजकिय आंधळेपणाचा आणि हव्यासातून आलेल्या आततायीपणाचा शासनामार्फत बुलडोजर सैरावैरा वृक्ष छाटीत निघाला आहे. पण पर्याय शोधला नाही उलट सिमेंट रस्त्याची भर त्यामुळे वातावरण दुषित होणं स्वाभाविक आहे. घरं रचली जातील, अहो पण वृक्ष नसतील तर माणसं कोसळतील त्याचं काय ? या जाणीवेनं वृक्ष वाचवा यासाठी संघर्ष समिती तयार करण्याची गरज आहे. 'झाडे लावा आणि झाडे जगवा'. नुसतं झाडं लावून भागणार नाही तर त्याची निगा राखली पाहिजे, जपवणुक केली पाहिजे. तेव्हा कुठे पर्यावरणाला बाधा होणार नाही तर सृष्टी नटलेली दिसेल बहर आलेला असेल अशावेळी झाडाची काळजी घेतली नाही तर वसुंधरेचं वाळवंट व्हायला वेळ लागणार नाही. तेव्हा 'झाडे लावा आणि झाडे जगवा' हा मंत्र प्रत्येक नागरिकानं आत्मसात करुन येणाऱ्या पावसाळयात एक तरी झाड लावून आपलं कर्तव्यपणाला लावावे, जेणेकरुन पर्यावरण दिन साजरा करण्याचं सार्थक होईल. सर्व पर्यावरण प्रेमींना आज जागतिक पर्यावरण दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

# विद्या विकास मंडळ करमाळा या संस्थेला राज्यस्तरीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्रदान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विद्या विकास मंडळ करमाळा या संस्थेला ३१ मे २०२५ रोजी कोल्हापूरमध्ये राज्यस्तरीय आदर्श शिक्षण संस्था व शिक्षक मेळावा संपन्न झाला. यामध्ये वैद्य विकास मंडळ करमाळा संस्थेला आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार राज्याची कुटुंब कल्याण आरोग्य मंत्री तथा कोल्हापूरची पालकमंत्री प्रकाश अबिटकर हातकलंगडे चे खासदार धैर्यशील माने, राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक , महाराष्ट्राचे नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर, भास्कर महाराज या मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने हा पुरस्कार व शिक्षक मेळावा पहिल्यांदाच कोल्हापूरमध्ये संपन्न झाला.

या महादलीच्या गुणवत्ता, कार्यपद्धतीवर आधारित हा पुरस्कार प्रदान करण्यात आला महाराष्ट्रातील ४० संस्थांना हा पुरस्कार देण्यात आला यामध्ये विद्या विकास मंडळ करमाळा या संस्थेचाही समावेश होता. या संस्थेतर्फे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा आहे अनुदानित उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन चालवली जाते विद्याविकास महामंडळ संस्थेमध्ये केजी ते पीजी पर्यंत शिक्षण दिले जाते या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात महाविद्यालयामध्ये दरवर्षी सातत्याने निकालाची उध्वल परंपरा उच्च दर्जाचे शिक्षण दिले जाते. या महोदयामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात महाविद्यालयामध्ये दरवर्षी सातत्याने निकालाची विद्वल परंपरा व उच्च दर्जा ही शिक्षण मोफत दिले जाते महाविद्यालयातील एन.सी.सी. व एन. एस .एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजाची व देशाची सेवा करण्याची बाळकडू दिली जाते त्यामुळे या संस्थेचा समावेश पुरस्कारामध्ये होता हा पुरस्कार संस्थेची सचिव विलासराव घुमरे सर संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड व संस्थेचे सदस्यांच्या वतीने संस्थेचे विश्वस्त कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाख राष्ट्रीय सेवा योजनेची जिल्हा समन्वयक प्राध्यापक लक्ष्मण राख यांनी स्वीकारला. या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख सोलापूर मनीष कळ जे, गणेश शिंदे प्रमुख प्रेरणादायी व्याख्याते उपमुख्यमंत्री आरोग्य कक्षाची महाराष्ट्राची अध्यक्ष मंगेश चिवटे, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉक्टर बापूसाहेब आडसूळ पंढरपूरचे वासकर महाराज यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला व या कार्यक्रमाचे संयोजन गणेश चिवटे हो एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे राज्यस्तरीय अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर बाबासाहेब यांनी केले होते या मिळालेल्या आदर्श पुरस्काराबद्दल विद्या विकास महामंडळाचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# लालपरीचा सच्चा सेवक – मारूती शिंदे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सध्या वेगवान युगात माणसं स्पर्धेत धावत आहेत, पण काही व्यक्तिमत्त्वं अशी असतात की जी धावतात जनतेसाठी, समाजासाठी. त्यांच्या प्रत्येक श्वासात एक सेवाभाव असतो. अशाच व्यक्तिमत्त्वामध्ये एक नाव अत्यंत आदराने घ्यावं लागतं – मारूती शिंदे.

म्हैसूरपासून माणकेश्वरीपर्यंत, पुण्यापासून पंढरपूरपर्यंत – जिथे जिथे महाराष्ट्राची 'लालपरी' म्हणजेच एस.टी. पोहोचते, तिथे तिथे तिचा खरा मित्र आणि सेवक म्हणून ओळख निर्माण केलेली आहे मारूती शिंदेंनी.

मारूती शिंदे हे केवळ एस.टी. महामंडळाचे एक जबाबदार कर्मचारी नाहीत, तर ते एक संवेदनशील लेखक, सामाजिक जाणिवेचा वारसा लाभलेला कार्यकर्ता आणि लोकांच्या मनामनात आपुलकी निर्माण करणारे माणूस आहेत. त्यांच्या लेखनशैलीत ग्रामीण जीवनाचं हळवं प्रतिबिंब असतं, त्यात मातीचा गंध असतो, आणि असतो एक समाजमनाला स्पर्श करणारा भावनिक सूर.

एस.टी. सेवा म्हणजे केवळ गाडी चालवणं नव्हे, तर ती आहे गावोगावच्या माणसांना एकत्र बांधणारी नाळ. ही नाळ अधिक मजबूत करायची जबाबदारी मारूती शिंदे यांनी हाती घेतली आणि ती ते अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडत आहेत.

त्यांच्या लेखांमधून केवळ शब्द नव्हे, तर अनुभव झिरपत असतात – एखाद्या वृद्ध प्रवाशाच्या डोळ्यांतील पाणी, शाळेत जाणाऱ्या लेकरांच्या चेहऱ्यावरचं हास्य, रात्रभर थांबलेल्या थांब्यावरून निघालेली एस.टी., आणि तिच्या चालक-वाहकांच्या डोळ्यांतली झोप विरुद्ध कर्तव्याची ज्योत. हे सर्व ते लिहितात – जिवंत, हृदयस्पर्शी आणि समाजमन जागवणारं.

मारूती शिंदे यांनी आपल्या कार्यकाळात आणि लेखनात एक गोष्ट स्पष्ट करून दिली आहे – सेवा ही वर्दीतून होत नाही, ती मनातून होते. त्यांचं मन हे सेवाभाव, कर्तव्यनिष्ठा, आणि समाजाशी असलेल्या नात्यांनी व्यापलेलं आहे.

आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या कुटुंबियांना, सहकाऱ्यांना, मित्रपरिवाराला आणि एस.टी. महामंडळाच्या सर्व प्रवाशांना आनंद होत आहे. कारण वाढदिवस केवळ वयानं मोठं होण्याचा दिवस नसून, समाजासाठी दिलेल्या योगदानाची उजळणी करण्याचा दिवस असतो.

मारूती शिंदे यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

आपल्या कार्यातून आणि लेखनातून असेच प्रेरणादायी कार्य करत राहा, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

आपल्या प्रत्येक प्रवासात 'लालपरी'च्या रुपानं समाजसेवेची ही ज्योत अधिक तेजाळो!

**– धोंडपा नंदे**
**संपादक, गावगाथा**
**वागदरी ता.अक्कलकोट**

**सेवेचा शुभारंभ शिर्डी येथून -देशभरात व आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू होणार उपक्रम**

**जगभरातील पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेणारा एक ऐतिहासिक उपक्रम**

# 'व्हॉईस ऑफ मीडिया' देणार सर्व पत्रकारांना मोफत आरोग्य सेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब :प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : जगभरातील पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेणारा एक ऐतिहासिक उपक्रम 'व्हॉईस ऑफ मीडिया' व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम संघटनेने सुरू केला असून, संघटनेच्या सर्व पत्रकार सदस्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोफत आरोग्यसेवा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवेचा शुभारंभ महाराष्ट्रातील शिर्डी येथून झाला असून, लवकरच ही सेवा भारताच्या सर्व राज्यांत तसेच जगभरातील व्हॉईस ऑफ मीडिया नेटवर्क असणाऱ्या सर्व देशांमध्ये सुरू होणार आहे.

'व्हॉईस ऑफ मीडिया' ही आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना आणि आत्मा मालिक हॉस्पिटल (श्री विश्वात्मक जंगलीदास महाराज ट्रस्ट संचालित) यांच्यात नुकताच आरोग्य सेवा करार झाला आहे. या करारानुसार, सात ते आठ लाख पत्रकार सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांसह एकूण ३० ते ३५ लाख नागरिकांना विविध वैद्यकीय सेवा पूर्णतः मोफत मिळणार आहेत.

> **हा उपक्रम म्हणजे पत्रकार बांधवांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारण्याची सुरुवात आहे. संपूर्ण देशात आणि परदेशात ही सेवा विस्तारली जाईल.**
> **– संदीप काळे, संस्थापक अध्यक्ष,**
> **व्हॉईस ऑफ मीडिया व VOM इंटरनॅशनल फोरम**

**औपचारिक घोषणा आणि करार:**

या कराराची औपचारिक घोषणा 'व्हॉईस ऑफ मीडिया' व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमच्या राज्यस्तरीय पत्रकार कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी आत्मा मालिक हॉस्पिटलचे सीईओ श्री. सुनील पोकळे यांनी केली. या सामंजस्य करारावर आत्मा मालिक हॉस्पिटलच्या वतीने सुनील पोकळे, तर व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने 'व्हॉईस ऑफ मीडिया' आरोग्य विंग प्रमुख भिमेश मुतूला यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

**कराराअंतर्गत मिळणाऱ्या प्रमुख सेवा:**

सर्वसामान्य तपासणी (OPD) – पूर्णपणे मोफत

IPD अंतर्गत सर्व उपचार – पूर्णपणे मोफत

ब्लड टेस्ट, एक्स-रे, सोनोग्राफी, एउऋ यांसारख्या मूलभूत तपासण्या – मोफत

आपत्कालीन सेवा (एशीसशपलू) आणि शस्त्रक्रिया (Surgery) – मोफत

आरोग्य शिबिरे, मानसिक आरोग्य मार्गदर्शन, तणाव व्यवस्थापन सेवा – मोफत

वार्षिक आरोग्य तपासणी पॅकेजेस – मोफत

हॉस्पिटलमध्ये उपलब्ध औषधांवर ५०% सवलत

या सर्व सेवा 'व्हॉईस ऑफ मीडिया' संघटनेचे सदस्यत्व प्रमाणपत्र व ओळखपत्र सादर केल्यानंतरच प्राप्त होतील.

**भविष्यकालीन आराखडा:**

या उपक्रमांतर्गत, येत्या वर्षभरात महाराष्ट्रातील सर्व प्रमुख शहरांमध्ये, देशभरातील सर्व प्रमुख राज्यांमध्ये आणि विविध आंतरराष्ट्रीय ठिकाणी ही मोफत आरोग्य सेवा सुरू केली जाणार आहे.

**संघटनेचा पुढाकार:**




पत्रकारांच्या हक्क, सुरक्षा आणि सामाजिक कल्याणासाठी कार्यरत असलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडिया' व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम संघटनेचा हा एक महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम ठरत आहे. संघटनेचा उद्देश केवळ पत्रकारांचे आर्थिक, व्यावसायिक नव्हे तर आरोग्यदृष्ट्याही सशक्तीकरण करणे हाच आहे. राज्यातील शेवटच्या पत्रकार यांच्यापर्यंत मोफत आरोग्य सेवेचा मूलमंत्र 'व्हॉईस ऑफ मीडिया' पोहोचवणार आहे, अशी माहिती 'व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी दिली आहे. या आरोग्य सेवेस प्रारंभ झालाय असे 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे राज्य समन्वयक कुमार कडलग आणि गोरक्ष मदने यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### रस्त्यात अडवून मारहाण; एकावर गुन्हा दाखल

सोलापूर : वापरण्यास दिलेली दुचाकी परत नेली म्हणून तरुणाला शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना शेळगी भागातील राही मंगल कार्यालयासमोर २ जून रोजी घडली.याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




नबीलाल रजाक शेख (रा- कुमारस्वामी नगर शेळगी सोलापूर ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत तौफिक जावीद बागवान (वय-३३- रा- मुक्तेश्वर नगर शेळगी) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे दोन जून रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास मोटार सायकलवरून घरी जात असताना राही मंगल कार्यालयासमोर यातील अरोपीने मागील आठवडयामध्ये फिर्यादीने अरोपीस वापरण्यास दिलेली मोटार सायकल परत नेल्याच्या कारणावरून चिडून जावून फिर्यादीस शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण करून त्यांचे हातातील फायटरने डोक्यावर व डाव्या कानाखाली मारून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास हवालदार जगताप हे करीत आहेत.

### दमदाटी केल्याप्रकरणी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर : तू माझ्या सोबतच रहायचे,बायकोसोबत रहायचे नाही असे म्हणून घरात घुसून शिवीगाळ करून धमकी दिल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपना बालू वाडेकर (रा.विद्या नगर शेळगी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव असून याबाबत मिनाक्षी दिनेश बनसोडे (वय-३० वर्षे, रा- बसंवतराव पाटील नगर दहिटणे) हिने फिर्याद दिली आहे. ३ जून रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास यातील यातील फिर्यादी पती,बहिणीचा मुलगा,वडील,व मुले असे सर्वजण घरात बसलेले असताना वरील अरोपी महिला ही बेकायदेशीर पणे घरात घुसून फिर्यादीच्या पतीस तु माझ्या सोबतच रहायचे, बायकोसोबत रहायचे नाही, नाहीतर तुला व तुझ्या घरच्यानाही जीवे मारते असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार जगताप हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# श्री विठ्ठल रुक्मिणी पददर्शन रांग पूर्ववत सुरू

## जतन व संवर्धन कामामुळे करण्यात आला होता बदल, भाविक पूर्वीप्रमाणे श्रींचे दर्शन घेऊन पश्चिमद्वारातून जातील बाहेर







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे शासनाच्या निधीतून पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली जतन व संवर्धनाचे काम सुरू असून, पश्चिमद्वार येथील जतन संवर्धनाचे काम पूर्ण झाल्याने. श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन करून भाविकांना पूर्वीप्रमाणे पश्चिम द्वारातून बाहेर जाता येणार असल्याची माहिती मंदिर समितीची व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन संवर्धनाचे काम सुरू असल्याने पदस्पदर्शनरांगेत बदल करून पश्चिमद्वार ऐवजी उत्तर द्वारातून भाविक दर्शन करून बाहेर जात होते. श्रींच्या पदस्पर्शदर्शनरांग पूर्ववत करण्यात आली आहे. श्रींची पदस्पदर्शनरांग स्कायवॉक वरून दर्शन मंडपात पाय-यावरून अंबाबाई दरवाजा येथून सोळखांबी येथील गरूड खांबाजवळून विठ्ठल गाभा-यात जावून दर्शन घेवून दक्षिण बाजूच्या द्वारातून बाहेर पडून रूक्मिणी गाभा-यात जावून रूक्मिणीचे दर्शन घेतील आणि मंदिराच्या पश्चिम दरवाजाने बाहेर पडतील.

मंदिर जतन संवर्धन कामामुळे दर्शनरांगेत आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्यात येतो. त्यामुळे भाविकांना दर्शनरांगेत अडथळा निर्माण होतो. परंतू, वारकरी भाविकांचे चांगले सहकार्य लाभत आहे. याशिवाय, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सर्व सदस्य महोदय, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली जतन व संवर्धनाचे काम ४० टक्के पूर्णत्वास आले असल्याचे व्यवस्थापक श्री श्रोत्री यांनी सांगितले.

# रखडलेल्या महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, निवडणुकीसाठी चालू किंवा पुढील आठवड्यातच प्रभाग रचना आणि आरक्षण जाहीर होऊ शकते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यातील रखडलेल्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद ,पंचायत समिती ,आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी हालचालींना वेग आला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग रचनेसाठी राज्य सरकारला सूचनाही दिली आहे. चालू किंवा पुढील आठवड्यातच प्रभाग रचना आणि आरक्षण जाहीर होऊ शकते असे निवडणूक आयोगातील सूत्रांनी सांगितले.

राज्यात सध्या बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासक राजवट आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींचा सहभाग नसलेली ही यंत्रणा केवळ अधिकारी वर्गाच्या ताब्यात आहे. सर्वोच्च न्यायालयाने मागील महिन्यातच स्पष्ट आदेश देत चार महिन्याच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी आणि त्याआधी चार आठवड्यात हार्दिक सूचना जाहीर करावी अशी निर्देश दिले होते.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात प्रभाग रचनेचा अधिकार राज्य सरकारने स्वतः कडे घेतला होता परिणामी, आता निवडणूक आयोगाने प्रभाग रचना पूर्ण करण्याची जबाबदारी पुन्हा राज्य सरकारवर सोपवली आहे व राज्य सरकार आता यावर लवकर भूमिका घेऊ शकते.

प्रभाग रचनेची प्राथमिक प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात असून याच आठवड्यात ती माहिती सादर होण्याची शक्यता आहे, असे सूत्राने सांगितले राज्य सरकारकडून माहिती मिळतात त्या आधारे प्रभागाचे आरक्षण आणि मतदार याद्या अंतिम करण्याची प्रक्रिया होईल. प्रभाग रचना, आरक्षण व मतदार याद्या ही तीन महत्त्वाची टप्पे पूर्ण झाल्यावरच प्रत्यक्ष निवडणुकीची घोषणा होणार आहे पावसाळ्यात निवडणुका घेण्यात निवडणूक आयोग इच्छुक नसल्याचे समजते त्यामुळे न्यायालयाकडे मुदतवाढ मागून ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यात निवडणुका घेण्याचा मानस आहे त्यामुळे साधारणतः ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यात निवडणुका घेण्याच्या दृष्टीने आयोगाच्या जोरदार हालचाली सुरू झाले आहेत.

# सिन्नर येथे मुख्याध्यापक एस. बी. देशमुख यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने सत्कार सोहळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :

पाताळेश्वर माध्यमिक विद्यालय, पाडळीचे मुख्याध्यापक एस. बी. देशमुख यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने सिन्नर येथील पंचवटी हॉटेल येथे सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी सिन्नर तालुक्याचे तहसीलदार. सुरेंद्रजी देशमुख यांच्या हस्ते. एस. बी. देशमुख यांचा शाल, बुके आणि पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यात देशमुख कुटुंब आणि कोसाकाचे माजी उपाध्यक्ष . नारायण मांजरे यांच्या हस्ते तहसीलदार सुरेंद्रजी देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. प्रशासकीय क्षेत्रातील त्यांच्या प्रामाणिक आणि मोलाच्या योगदानाबद्दल हा सन्मान करण्यात आला.

तहसीलदार मा. श्री. सुरेंद्रजी देशमुख. मुख्याध्यापक एस. बी. देशमुख यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले की, एस. बी. देशमुख यांनी मुख्याध्यापक संघाच्या माध्यमातून निवडणुकीची कामे अत्यंत चोखपणे पार पाडली. सिन्नर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी शिक्षकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. पुढे ते म्हणाले, शिक्षण संस्था चालकांच्या प्रश्नांसाठीही . एस. बी. देशमुख आपल्या अनुभव आणि कार्यकुशलतेच्या माध्यमातून भविष्यात योगदान देतील, यात शंका नाही.

यावेळी एल. डी. बेणके (मुख्याध्यापक, गोपाल विद्यालय, पिंपळे), एम. डी. काळे,(मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, गुळवंच). बी. आर. चव्हाण, बी. व्ही. पांडे (मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, विंचूरदळवी). टी. के. रेवगडे(कोषाध्यक्ष, बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्था. एम. एन. देशमुख यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्र तसेच आप्तेष्टासह अनेकांनी हजेरी लावली.

# बेरोजगार उमेदवारांसाठी ६ जूनला रोजगार मेळाव्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर व के.पी.मंगळवेढेकर इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी शुक्रवार दिनांक ६ जून २०२५ रोजी एस.पी.एम. इंग्लिश मिडियम स्कुल, डफरिन चौक, होम मैदान समोर, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.

पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे उद्घाटन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या शुभहस्ते होणार आहे. या रोजगार मेळाव्यास जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. जिल्ह्यातील नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने सदर रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आय.टी.आय, वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीयन, मशिन ऑपरेटर, बी.कॉम, एम.कॉम अशा प्रकारची एकुण २ हजार १०० पेक्षा जास्त रिक्तपदे १८ उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत. नोकरी इच्छुक उमेदवरांनी रिज्युमच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह शुक्रवारी दिनांक ६ जून २०२५ ठीक सकाळी १० ते २ वाजेपर्यंत एस.पी.एम. इंग्लिश मिडियम स्कुल, डफरिन चौक, होम मैदान समोर, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयानी वेळेत ०२१७-२९९२९५६ या दुरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा तसेच https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट द्यावी, असे आवाहनही कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.

# पँथर युवराज मामा पोळ यांच्या जयंतीनिमित्त उपजिल्हा रुग्णालय, वृद्धाश्रमात फळे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे :

इंदापूर : आंबेडकरी चळवळीतील पँथर तसेच भीम शक्ती सामाजिक संघटनेचे तत्कालीन तालुकाध्यक्ष युवराजमामा पोळ यांच्या जयंतीनिमित्त इंदापुरातील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना तसेच टेंभुर्णी येथील डोंगर तुकाई ग्रामविकास प्रतिष्ठानच्या अंतर्गत असणाऱ्या गोविंद वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना फळे वाटप करून जयंती साजरी करण्यात आली. या वेळी पँथर युवराजमामा पोळ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. भीमशक्ती सामाजिक संघटनेचे तालुकाध्यक्ष सम्राटसिंह युवराज पोळ म्हणाले, पँथर युवराज मामा पोळ यांनी इंदापूर तालुक्यातील शोषित वंचित पीडित वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले त्यांनी त्यांच्या कारकीर्दीमध्ये गोरगरीब अन्यायग्रस्त लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी इंदापूर तालुक्यातील कोणत्याही व्यक्तीचा व त्याच्या वरचा अन्याय झालेला न पाहता त्याला न्याय मिळवून देण्यासाठी सदैव रस्त्यावरची लढाई लढली त्याच्या माध्यमातून आंदोलन अमरण उपोषण साखळी आंदोलन इंदापूर बंदची हाक अशा वेगवेगळ्या आंदोलनातून त्यांनी अन्यायग्रस्त लोकांना न्याय मिळवून दिला युवराज मामा पोळ यांनी इंदापूर तालुक्यामधील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, व छत्रपती शिवाजी महाराज, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व इतर महापुरुषांच्या विचारांचा आणि आचारांचा जाळ निर्माण केलं त्यातूनच त्यांनी असंख्य लोकांना न्याय मिळवून दिला असंख्य युवकांना त्यांच्या हाताला काम मिळवून दिले असंख्य कुटुंबांना शासकीय योजनेचा फायदा मिळवून दिला असे पँथर युवराज मामा पोळ ज्यांचं सांगावं नवल तेवढं कमीच आहे त्यांच्या आयुष्यामध्ये मोठ-मोठी आंदोलने त्यांनी कोणत्याही प्रकारचे कोणतेही गालबोट न लागता त्या इंदापूर तालुक्यामध्ये केली व त्यातून असंख्य व्यक्तींना न्याय मिळवून दिला युवराज मामा पोळ हे फक्त केवळ तालुक्यातीलच नाही तर तालुक्याच्या बाहेरील गोरगरिबांना सतत मदतीचा हात देणारे युवराजमामा पोळ यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी म्हणून फळे वाटप करण्यात आली. असे उपक्रम यापुढे देखील सातत्याने सुरू ठेवणार आहे. व पँथर युवराज मामा पोळ यांचे आचार आणि विचार आणि इंदापूर तालुक्यामधील आंबेडकरी समाजाचे जाळी निर्माण केलेले हे पुढे नेण्याचं काम मी सम्राटसिंह सुधीर पोळ त्यांचा मुलगा या नात्याने सदैव समाजाची बांधिलकी जपण्यासाठी कटिबद्ध राहील असा शब्द देतो. यावेळी उपस्थित शीतल साबळे, विशाल लांडगे, दत्ता पोळ, नवनाथ गायकवाड, पांडुरंग मोहिते, किरण मिसाळ, अरुण कांबळे, आदित्य भोसले, प्रथमेश गायकवाड, कुमार डाकूरकर यांच्यासह भीमशक्ती सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी** | **पोलिस प्रशासनाला दिले निवेदन**

# डिजिटल मीडियाचे प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ भोकरे याना जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या अज्ञात ईसमाचा नळदुर्ग येथे जाहीर निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड: महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई सलग्न डिजिटल मेडियाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा दै.जनप्रवास चे संपादक सिद्धार्थ संजय भोकरे याना निनावी पत्राद्वारे जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या अज्ञात इसमाचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तालुका शाखा तुळजापूरच्या वतिने जाहीर निषेध करण्यात आला.



या संदर्भात नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सपोनि ईश्वर नांगरे पाटील याना पत्रकार संघाच्या वातीने देण्यात आलेल्या लेखी निवेदनात म्हाटले आहे की डिजिटल मीडीयाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यानी ऑपरेशन सिंदूर बाबत लिहीलेल्या लेखामध्ये भारतीय आभिनेत्यानी पाकिस्तानच्या विरुध्द उभे राहून भारतदेशाचा गौरव करून देशाबद्यलचा आभिमान व्यक्त करावा असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. त्या लेखाचा संदर्भ देत अज्ञात व्यक्तीनी आभिनेते खान बंधूची माफी मागावी अन्यथा जिवंत ठार मारण्यात येईल अशी धमकी निनावी पत्राद्वारे दिली असून सदर प्रकार हा आभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा असून निंदनिय आहे. या घटनेचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तालूकाशाखा तुळजापूर च्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असून संबंधित आरोपीचा शोध घेवून त्याच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सपोनि याना देण्यात आलेल्या निवेदनावर पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्य अरुण लोखंडे, डिजिटल मिडिया चे जिल्हा सरचिटणीस एस. के. गायकवाड,पत्रकार संघाचे विजय पिसे, संजय पिसे, ईरफान काझी, किशोर धुमाळ सह पत्रकारांच्या सह्या आहेत..

# वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर सोलापुरातील आशाराणी भोसले प्रकरणाने खळबळ; उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची गंभीर दखल

## कोणताही दबाव न घेता कायद्याच्या चौकटीत निष्पक्षपणे तपास करून न्याय दिला जावा; पोलीस प्रशासनाला निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील चिंचोली एमआयडीसी, तालुका मोहोळ येथे राहणाऱ्या २६ वर्षीय सौ. आशाराणी भोसले यांनी दिनांक ३ जून २०२५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली, असा प्राथमिक अंदाज माध्यमांतून समोर आला आहे. मात्र ही आत्महत्या नसून सासरच्या मंडळींच्या मानसिक छळामुळे त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे.

या दुर्दैवी घटनेची गंभीर दखल विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली असून, त्यांनी तातडीने सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती घेतली व सखोल तपास करण्याचे निर्देश दिले आहेत.

आशाराणी भोसले या तीन महिन्यांच्या गर्भवती होत्या, आणि त्यांना दोन वर्षांची मुलगीही आहे, ही बाब मन हेलावणारी आहे. त्यांच्या नातेवाईकांनी सांगितल्याप्रमाणे, सासरच्या मंडळींकडून त्यांना सातत्याने छळ सहन करावा लागत होता. चार ते पाच वेळा घरगुती वाद निर्माण झाल्यानंतर त्यांच्या माहेरच्या मंडळींनी मध्यस्थी करून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र अखेर या मानसिक छळाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केली असावी, असा संशय व्यक्त होत आहे.

पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर लगेचच सोलापूरात घडलेली ही घटना महिलांच्या सुरक्षिततेविषयी गंभीर प्रश्न उपस्थित करत डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणी पोलीस प्रशासनाला सखोल आणि निष्पक्ष तपासाचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यांनी सांगितले की, ही आत्महत्या की पूर्वनियोजित हत्या याचा तपास वैज्ञानिक आणि न्यायवैद्यकीय पद्धतीने करण्यात यावा. घटनास्थळाचा पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, आणि गळफास लावण्याच्या स्थितीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करावा.

या प्रकरणात सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून, डॉ. गोऱ्हे यांनी तत्काळ आरोपींना अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश पोलीस प्रशासनाला दिले आहेत. कोणताही दबाव न घेता कायद्याच्या चौकटीत निष्पक्षपणे आणि जलदगतीने तपास करून न्याय दिला जावा, अशी आग्रही भूमिका डॉ. गोऱ्हे यांनी घेतली आहे.

पीडित कुटुंबाला आवश्यक ती कायदेशीर व मानसिक मदत सरकारमार्फत पुरवण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले. या अनुषंगाने, पोलीस अधीक्षकांनी माहिती दिली की आशाराणी यांची दोन वर्षांची मुलगी सध्या तिच्या आजोबा-आजींकडे म्हणजेच आईच्या माहेरी आहे. यावर प्रतिक्रिया देताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, या बाळासाठी कोर्टाची ऑर्डर घ्यावी लागेल का, की तिच्या माहेरची मंडळी स्वतः तिला सांभाळण्यासाठी तयार आहेत, याची माहिती घेऊन त्यानुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया राबवावी.

संपर्क: रोहिणी संपत ठोंबरे ९०८२९९१७८३

# शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने कृषीमंत्र्यांना पिक विमा मिळवण्यासाठी निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : आमच्या बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा २३/२४ खरीप व रब्बी हंगामातील ८० % पीक विमा बाकी आहे हे पोट तिडकीने कृषिमंत्र्यापुढे मांडले

निवेदन दिल्यानंतर कृषिमंत्र्यांनी आज दिनांक ४/६/२०२५ च्या बैठकीमध्ये हा विषय मार्गी लावायचा असे आश्वासन शेतकरी योद्धा बालाजी सोसे गजानन जायभाये शेतकरी मित्र गजानन सोनुने यांना आश्वासन दिले असून संबंधित निवेदन तात्काळ आजच्या बैठकीमध्ये हा विषय मार्गी लावायचा असे आदेश कृषिमंत्री माणिकदादा कोकाटे यांनी त्यांच्या संबंधित विभागाला दिले आहे आज कृषिमंत्री श्री माणिक दादा कोकाटे यांना निवेदन देण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातून शेतकरी योद्धा कृती समितीची जी टीम आली होती दिनांक ४ जूनला सकाळी १० वाजेपासून पोलीस संरक्षणाच्या निगराणीखाली पोलिसांनी ताब्यात घेऊन संबंधित सर्व शेतकऱ्यांना कृषी मंत्री माणिकदादा कोकाटे यांच्या भेटीसाठी स्वतः मंत्रालयामध्ये पाच ते सहा पोलीस कर्मचारी यांच्या निगराणीखाली यांच्या बंदोबस्तामध्ये कृषी मंत्र्यांची भेट घडून आणली आणि कृषीमंत्र्यांनी सांगितले की आजच्या बैठकीमध्ये पीक विम्याच्या संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतल्या जाणार आहे असे आश्वासन दिले.



# म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत कोरडा नदीत पाणी सोडावे : आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : सांगोला तालुक्यातील म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत कोरडा नदीत पाणी सोडण्याची मागणीचे पत्र जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिले आहे.

सांगोला तालुक्यातील सुमारे ३० ते ३५ गावे यात येत असून म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत सांगोला तालुक्यातील माण व कोरडा नदीवर १९ बंधार्यांवर अवलंबून असणाऱ्या १९०० ते २००० हेक्टर जमिनीसाठी पाणीसाठा कमी क्षमतेने असल्याने सांगोला तालुक्याचे हक्काचे पाणी तात्काळ सोडल्याने माण व कोरडा नदीवर अवलंबून असणारे १९ बंधारे पूर्ण क्षमतेने भरण्याची आवश्यकता असून शेतकऱ्यांच्या पिकांचा प्रश्न याद्वारे तात्काळ मार्गी लागेल.

यासाठी सांगोला तालुक्याचे हक्काचे पाणी म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत कोरडा नदीत पाणी सोडण्यात येवून सर्व बंधारे पूर्ण क्षमतेने भरण्यात यावेत अशी मागणी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केलेली असून मंत्री महोदयांनी यावर सकारात्मक दर्शविल्याचे आमदार डॉ.बाबसाहेब देशमुख यांनी सांगितले.


महाराष्ट्र शासन

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट, जि. सोलापूर.**

म्हाडा कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अक्कलकोट.

e-mail : itisoakt@yahoo.com websire http://www.dvet.gov.in

Industrial Training Institute

**या संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ करीता खालील व्यवसायामध्ये ONLINE पध्दतीने प्रवेश सुरु**

**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५**

| अ.क्र. | व्यवसाय (ट्रेड) चे नाव | कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|
| १. | ड्रेसमेकींग | १ वर्ष | SSC पास/नापास | 20 |
| २. | संधाता (वेल्डर) | १ वर्ष | SSC पास/नापास | 40 |
| ३. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | SSC पास | 20 |
| ४. | जोडारी (फिटर) | २ वर्ष | SSC पास | 20 |
| ५. | वीजतंत्री (ईलेक्ट्रीशयन) | २ वर्ष | SSC पास | 40 |
| | | | एकुण जागा | 140 |

*** वैशिष्ट्ये ***

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश गुणवत्तेवर व शासकीय नियमा नुसार दिले जातील. | ८. | परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अखिल भारतीय स्तरावरचे प्रमाणपत्र |
| २. | सुसज्ज प्रशासकीय इमारत व कार्यशाळा. | ९. | अनुभवी व तंत्र निदेशक वर्ग |
| ३. | रोजगार/नोकरीची खात्री देणारे प्रशिक्षण. | १०. | प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण |
| ४. | पात्र प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन. दरमहा ५००/- रुपये ८०% उपस्थिती अनिवार्य | ११. | एस.टी पासची सोय |
| ५. | ग्रंथालय सुविधा, सुसज्ज AVTS Room, Computer Lab. | १२. | अद्यायावत वसतीगृह सुविधा |
| ६. | सर्व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना कंपनी मधुन अप्रेंटिशीपची संधी | १३. | निसर्ग रम्य वातावरण |
| ७. | तंत्रनिकेतनास ( Diploma) थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश (अटी लागू) | १४. | ८०% उपस्थिती आवश्यक |

*** प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ***

| अ.क्र. | प्रवेश तपशिल | प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (SC) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| २) | अनुसूचित जमाती (ST) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| ३) | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग (VJNT-1, NT-2, NT-3) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ४) | इतर मागास प्रवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ५) | अपंग, तांत्रिक, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, बोस्टर स्कूल | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, व संबंधीत EWS प्रमाणपत्र |
| ६) | अन्य (OPEN) संवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला |
| ७) | इतर प्रमाणपत्र | NCC, MCC, जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा प्रमाणपत्र/रहीवाशी दाखला/ तीन फोटो/आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स, |

* आपले प्रवेश अर्ज विहीत मुदतीत https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन सादर करावे.
* प्रवेश माहिती पुस्तिका ही https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
* प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियमावलीतील भाग १ व भाग २ दोन नुसार होईल.
प्रवेश प्रक्रिया शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी चालू राहील.
*

*** महत्वाची सुचना ***


१) ऑनलाईन प्रवेश भरल्यानंतर उमेदवारांना मिळालेला युजर आयडी व पासवर्ड जतन व नोंद करुन ठेवावा. पुढील प्रवेश प्रक्रियेच्या सर्व टप्पयावर अंतिम प्रमाणपत्र मिळेपर्यंत तो आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विहीत शुल्क भरावे.
३) अर्ज निश्चितीसाठी (Confirmation) जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी. अर्ज निश्चित झाल्या शिवाय विकल्प (Option) दिसणार नाही.
४) अर्ज निश्चितीची पावती व निश्चित केलेल्या अर्जाची प्रत प्राप्त करुन घ्यावी व प्रवेश फेरीच्या वेळी संस्थेत सादर करावी.
५) अर्ज निश्चिती करताना भरलेल्या अर्जाची एक प्रत व सर्व आवश्यक कागदपत्राची झेराक्स प्रत जोडावी. तसेच आवश्यक तेवढ्या प्रती काढून स्वतः जवळ ठेवाव्यात.
६) उमेदवाराने आपला अर्ज भरताना स्वःताचा किंवा आपल्या कुंटुबातील सदस्याचा चालू असलेला मोबाईल क्रमांक व आपला ई-मेल आयडी बिनचूक पणे नोंदवावा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी, बदलू नये. नोंदविलेला मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी व बँक खात्याशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्या शिवाय SID पोर्टलवर आपला PRN जनरेट होणार नाही.
७) निश्चित झालेल्या अर्जाची (Confirmed Application) प्रत व शुल्क भरल्याची पावती जपून ठेवावी.
८) प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास पुर्ण प्रशिक्षण शुल्क वसुल करण्यात येईल.
९) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे व तीन झेरॉक्स सेट सोबत आणावे.
१०) प्रवेश निश्चित झाले नंतर जमा केलेले प्रशिक्षण शुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही.
११) ऑनलाइन स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.

*** प्रवेशित उमेदवारांना खालील प्रमाणे शुल्क रोखीने भरावे लागेल. ***

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | कालावधी | खुल्या गटा करीता वार्षिक शुल्क रुपये (Open) | (Open) Total Rs. | मागासवर्गीया करीता वार्षीक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशयन) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2000+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3250/- | 02 वर्षे 1250/- |
| 2. | जोडारी (फिटर) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2400+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3650/- | 02 वर्षे 1250/- |
| 3. | वेल्डर (संधाता) | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1200+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 2150/- | 01 वर्षे 950/- |
| 4. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1000+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1950/- | 01 वर्षे 950/- |
| 5. | ड्रेसमेकींग | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 800+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1750/- | 01 वर्षे 950/- |
| 6. | वसतिगृह | | अनामत 1000/वार्षिक शुल्क 1200 | 2200/- | 2200/- |

टीप :
प्रवेशाच्या सविस्तर माहिती साठी संस्थेत प्रत्येक्ष संपर्क साधावा.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट
जिल्हा सोलापूर.



# राष्ट्रवादी नेते रमझान शेख यांच्यातर्फे नागरिकांना छत्र्यांचे मोफत वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे /प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधिमंडळ गटनेते आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड आणि ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई यांच्या हस्ते महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव रमझान शेख यांच्या तर्फे नागरिकांना मोफत वाटप करण्यात येणाऱ्या छत्र्यांचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी ठाणे जिल्हा प्रशासन सरचिटणीस राजेश साटम, ठाणे जिल्हा सचिव सचिन कुऱ्हाडे, राजेश कदम, फुलबानो पटेल, मनीषा पाटील, इस्माईल शेख, रुबीना शेख यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पावसाळ्याच्या तोंडावर मोफत छत्र्यांचे वाटप हा एक महत्त्वाचा आणि जनहितकारी उपक्रम ठरतो. विशेषतः गरजू, विद्यार्थी, रस्त्यावर काम करणारे मजूर, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हा उपक्रम खूपच फायदेशीर ठरतो. राष्ट्रवादी नेते महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव रमझान शेख यांनी अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मकतेचा संदेश जातो, असे सांगितले. पावसाळ्याच्या सुरुवातीला केलेले हे मदतीचे पाऊल अनेकांसाठी उपयोगाचे ठरते. अशा सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरांमध्ये समतेची आणि सहकार्याची भावना वृद्धिंगत होते, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

## आयटीआय व हो रायझन ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी दिला उस्फुर्त प्रतिसाद

# महावितरणची निफाड उपविभागात निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





निफाड/प्रतिनिधी : महावितरण तर्फे निफाड येथे निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन.

आयटीआय कॉलेज रसलपुर,व होरायझन अर्क्डमी स्कूल निफाड येथे दि.३ व दि.४.रोजी ठिक १०.०० वा.महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त विद्युत सुरक्षितताया विषयावर चित्रकला व निबंध स्पर्धे चे आयोजन करण्यात आलेले होते.

सदर स्पर्धेमध्ये निफाड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील विद्यार्थांनी १२० विद्यार्थ्यांनी व होरायझन अर्क्डमी स्कूल मधील ८९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता केशव काळुमाळी यांचे मार्गदर्शनाखाली व निफाड उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे यांचे उपस्थितीत तसेच सहाय्यक अभियंता योगेश जाधव, हेमंत शिनकर, राजेश अजमिरे, साकेत पाटिल, स्वप्निल सवई, श्रीमती छाया आहेर, राहुल भगत, कनिष्ठ अभियंता जितेंद्र बोरसे, जनमित्र कुमावत, शंकर पवार तसेच विद्युत कर्मचारी हर्षल टापसे शुकराम बागुल, प्रकाश टबाले, योगेश काळे, विशाल शिंदे, अमोल नागरे, भास्कर पखाले, किरण राजोळे, रोशन जाधव, विलास वडघुले, कांतीलाल कुमावत, अभिजीत घुगे, प्रवीण आहेर यांचे सहकार्याने स्पर्धा पार पडली.

तसेच कार्यक्रमाचे प्रस्ताविक हे जितेंद्र बोरसे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी पणे पडण्याकरीता औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), रसलपुर, निफाड येथिल प्राचार्य श्रीमती शिंदे, प्राध्यापक गबाले, तसेच होरायझन ॲकॅडमीच्या स्नेहल सोनवणे, शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विसाव्या वर्धापनदिनानिमित्त राज्यभरात एक ते सहा जून दरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताह चे आयोजन करण्यात आले त्या अनुषंगाने महावितरणच्या विसाव्या वर्धापन दिन निमित्त आम्हा विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षा ते बाबत काय उपाययोजना करायला पाहिजे हे. यासाठी चित्रकला व निबंध स्पर्धा भरवून आम्हाला व्यासपीठ उपलब्ध करून दिले त्याद्वारे वीज वितरण ची जनजागृती करण्याची संधी दिली त्याबद्दल खूप आनंद होतो**

**वीज वापराबद्दल त्याचे फायदे व नुकसान आम्हाला समजावून सांगितले नक्कीच त्याचा आम्हाला व जनतेला फायदा होईल**

**– राधिका बडगुले विद्यार्थिनी**

**दैनंदिन जीवनातील विद्युत महत्त्वाचा घटक असल्यामुळे त्याविषयीची जनजागृतीसाठी शाळा आहे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे ,जिथे लहान मुलांना विजेचे चे फायदे विज वापरताना घ्यावयाची काळजी आणि विजेचा गरजेपुरता वापर कसा करावा,याविषयीची माहिती व ज्ञान मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीने विसाव्या वर्धापन दिनानिमित्त विद्युत सुरक्षा सप्ताह अंतर्गत होरायझन क्॑डमी निफाड या आमच्या शाळेत जी निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा आयोजित केली त्यामुळे निश्चितच शाळेतील मुलांना विज वापराविषयी विद्युत सुरक्षा विषयी जागृती होईल अगदी सुंदर उपक्रम विद्युत वितरण कंपनीने सुरू केला आहे**

**– स्नेहल सोनवणे ,,प्राचार्य होरायझन अर्क्डमी स्कूल**